## तरुणांनी सांगड घालावी - डॉ. शिंदे

*कोल्हापूर, दि. १०*

तरुणांनी शारिरीक आणि मानसिक कष्टाची सांगड घालून शुद्ध आचरण, देशप्रेम, सर्वधर्म समभाव या मुल्यांची जोपासना केली पाहिजे, असे उद्‌गार डॉ. जे. बी. शिंदे यांनी काढले. ते कमला कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनतर्फे आयोजित महात्मा गांधी जयंती कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. एन. एस. शिरोळकर होते.

श्री. शिंदे पुढे म्हणाले गांधीजींचे चरित्र आणि त्यांची जीवनमुल्ये हा महान ठेवा आहे. या जीवनमुल्यांचे सर्वांनी आचरण केल्यास सामाजिक समस्या निर्माण होणार नाहीत. प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ए. एस. घस्ते यांनी केले तर कुमारी गायकवाड हिने आभार मानले. कार्यक्रमास प्राध्यापक प्राध्यापिका विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

पुढारी 2/10/99

## आंतरविभागीय महिला बास्केटबॉल
## कन्या व कमला कॉलेजची विजयी सलामी

**अक्कलकोट, दि. १ (वार्ताहर) : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आयोजित आंतरविभागीय महिला बास्केटबॉल स्पर्धेचे शानदार उद्‌घाटन आज अक्कलकोट येथील सी. बी. खेडगी महाविद्यालच्या प्रांगणात महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेचे उपाध्यक्ष प्रा. पुरणचंद्र पुंजाल यांच्या हस्ते संपन्न झाले. अध्यक्षस्थानी अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन शिवशरण खेडगी हे होते.**

प्रारंभी स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन प्रा. पुंजाल यांच्या हस्ते करण्यात आले. नंतर श्रीफळ फोडून स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी झालेल्या बास्केटबॉल स्पर्धेमध्ये सांगलीच्या कन्या महाविद्यालयाने वारणानगरवर विजय मिळविला. सांगलीच्या विजयी संघाच्या वतीने भूमी पितांबरे हिने १४ गोल केले तर कु. माधुरी तामणसर हिने सर्वाधिक १६ गोल केले. पराभूत वारणानगर संघाच्या वतीने सरिता पाटील हिने सर्वाधिक ८ गोल केले तर कु. जाधव हिने ६ गोल केले. यावेळी झालेल्या दुसऱ्या साम कोल्हापूरच्या कमला कॉलेजने सात सायन्स महाविद्यालयावर २३ वि. १० गोलने विजय मिळविला. कोल्हापूरच्या विजयी संघाच्या वतीने कु. जे. आर. पवार हिने सर्वाधिक १० गोल केले तर कु. जे. आर. सावंत हिने ८ गोल केले तर पराभूत सातारा संघाच्या वतीने कु. कल्पना नलावडे हिने सर्वाधिक ८ गोल केले.

---

सकाळ 31/10/99

**११ कोल्हापूर**

## म्हाकवे परिसरात पावसाची हजेरी

*म्हाकवे दि. ३० (वार्ताहर)*

म्हाकवे परिसरात वळवाच्या पावसाने भुईमूग व इतर पिकांना जीवदान मिळत असले तरी भात कापणी व मळणीच्या कामामध्ये अडथळा निर्माण होत आहे.

गेल्या दोन दिवसापासून पावसाने वळीव स्वरूपात हजेरी लावल्याने शेतकरी सुखावला असून भुईमूग,तुर ,वरणा, मिरची, ज्वारी व इतर कडधाण्यांना हा पाउस उपयुक्त असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.परिसरात भात कापणी व मळणीमुळे झुबंड उडाली आहे.



जिल्हास्तर महिला बास्केट बॉल स्पर्धेत अजिंक्य ठरलेला कमला कॉलेजच्या मुलींचा संघ.

## विभागीय बास्केटबॉल स्पर्धेत कमला कॉलेजच्या मुलींचा संघ अजिंक्य

*कोल्हापूर, दि. ३०*

येथील महावीर महाविद्यालयात झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय बास्केट बॉल स्पर्धेत कमला कॉलेजच्या मुलींच्या संघाने अजिंक्यपद पटकावून विजयाची परंपरा कायम राखली. तर याच महाविद्यालयातील महिला हँडबॉल संधाने जिल्हास्तरीय स्पर्धेत यश मिळवले (कप्तान), तेजस्वीनी पोवार, तेजस्वीनी सावंत, गीता पाटील, सीमा गावडे, आक्काताई पाटील, प्राची चांदेकर, अश्विनी पाटील, अस्मा देसाई, मनिषा गुरव, भारती लोहार, वर्षा माने, सुखदा बनसोडे शितल चौगले, कु. अनिता चौगले, अर्चना कांबळे या खेळाडूंचा समावेश होता.

याच महाविद्यालयातील उच्च माध्यमिक संघाने जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावले आहे. या संघात क्षमा पाटील, अर्चना कांबळे, प्राजक्ता हराळे, रोहिणी कार्वेकर, प्रफुल्ला सुर्वे, शितल चौगुले, अनिता चौगुले, भारती चौगुले, स्वाती जाधव, शिल्पा हुकीरे, मंजुषा आवटी, रूपाली जाधव यांचा समावेश होता.

या खेळाडूंना प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, श्रीमती सुनिता काळे, श्रीमती